# खानापूर विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढविणार : संजय विभूते

## संपर्क नेते भास्कर जाधव यांनी निवडणूक लढविण्यासाठी तयारीला लागण्याचे दिले आदेश

**जनप्रवास । विटा**

कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसने खानापूर विधानसभा मतदारसंघाची मागणीच केली नाही. या मतदारसंघावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा नैसर्गिक हक्क आहे. त्यामुळे खानापूर विधानसभा मतदारसंघाची जागा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे लढविणार आहे. आमच्या पक्षाचा आमदार व्हावा, ही विचारधारेतून निष्ठावंत कार्यकर्ता आहे. त्यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून निवडणूक लढविणार असल्याची घोषणा जिल्हाप्रमुख संजय विभूते यांनी पत्रकार परिषदेत केली.

यावेळी उपजिल्हा प्रमुख शिवाजीराव शिंदे, विधानसभा क्षेत्रप्रमुख वीरू फाळके, तालुकाप्रमुख राज लोखंडे, अमीर मुलानी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



पत्रकार परिषदेत बोलताना संजय विभूते.

संजय विभूते म्हणाले, संपर्क नेते भास्कर जाधव यांनी खानापूर मतदारसंघातून आपण निवडणूक लढविण्यासाठी तयारीला लागण्याच्या सूचना दिल्या आहेत. गेल्या दोन वेळा शिवसेना पक्षाने विजय मिळवला आहे. त्यामुळे या मतदार संघावर शिवसेनेचा नैसर्गिक हक्क आहे. या मतदार संघातील प्रस्थापित सर्वच नेते महायुतीमध्ये आहेत. मात्र यातील बहुतांश नेत्यांचा शिंदे गटाच्या उमेदवारीला विरोध आहे. त्यामुळे त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून उमेदवारी करावी, यासाठी मागणी होत आहे.

मतदारसंघातील प्रस्थापित नेत्यांनी आता सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीला आमदार करण्यासाठी माझ्या पाठिशी ताकद उभा केली पाहिजे, असे आवाहन जिल्हाप्रमुख संजय विभूते यांनी केले आहे. अलिकडच्या काळात विरोधी पक्षाच्या आमदारांचा निधी अडवण्याचे प्रकार विशेषतः २०१४ नंतर वाढले आहेत. पूर्वी विरोधी आमदारांनाही निधी दिला जात होता. हे राजकारण बदलण्यासाठी राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणे गरजेचे आहे. सध्या राज्यात धार्मिक तेढ निर्माण करण्याचे काम काही लोक जाणिवपूर्वक करीत आहेत काय ? अशी शंका निर्माण होत आहे. मात्र नागरिकांनी त्याला बळी पडू नये, असे आवाहन विभूते यांनी केले.

### गावनिहाय दौरा करून जनतेशी संवाद साधणार

मिंदे गटाविरुद्ध एकास एक लढत व्हावी यासाठी मी मतदारसंघातील माजी आमदार सदाशिवराव पाटील, माजी आमदार राजेंद्रअण्णा देशमुख, वैभव पाटील आणि आमदार गोपीचंद पडळकर यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली आहे. त्यांना आपण एक महिन्यात विचार करून सांगा, असे त्यांना सांगितले होते. मात्र अद्याप त्यांचा निर्णय झालेला आहे. त्यामुळेच भास्कर जाधव यांच्या आदेशानुसार मी निवडणूक लढविण्याच्या तयारीला लागलोय. शिवसेनेची मशाल ताकदीने पेटेल. पितृपंधरवडा झाल्यानंतर मतदारसंघाचा गावनिहाय दौरा करून जनतेशी संवाद साधून भूमिका मांडणार आहे.